

मतदार याद्या झोपेत तयार केल्या का?

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in शुक्रवार दिनांक 28/11/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन ‖ पिंपरी चिंचवड व पुणे ‖ पान 5 ‖ अंक 280 ‖ RNI - MAHMAR /2021/51259 ‖ metrocity924@gmail.com


# पुणेकरांना 9 हजार 857 कोटींची भेट!

## पुण्यातील विस्तारीत प्रकल्पांना मंजुरी



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (२६ नोव्हेंबर) पार पडलेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनच्या (महामेट्रो) पुण्यातील विस्तारीत प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. यामध्ये दुसऱ्या टप्प्यातील खराडी-हडपसर-स्वारगेट-खडकवासला या आणि नळ स्टॉप-वारजे-माणिकबाग या चौथ्या (अ) मार्गिकेला मंजुरी देण्यात आली.**

पुण्यातील मेट्रो विस्तारामुळे शहरातील पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत आणि दक्षिणेपासून उत्तरेपर्यंतचा प्रवास सुलभ आणि सुकर होणार आहे. प्रामुख्याने हडपपसर, मगरपट्टा परिसरातील आयटी कंपन्या, औद्योगिक आस्थापनांबरोबर, बाजारपेठा आणि सर्वसामान्य पुणेकरांना याचा मोठा फायदा होणार आहे.एकूण ३१.६४ किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पासाठी ९,८५७.८५ कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, पुढील पाच वर्षांत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यापैकी खराडी-हडपसर-स्वारगेट-खडकवासला हा मार्ग २५.५२ किलोमीटर लांबीचा आहे. त्यासाठी २२ उन्नत स्थानके प्रस्तावित करण्यात आले आहे.खराडी, हडपसर, मगरपट्टा आयटी पार्क या मार्गिकेवर असल्याने मोठा फायदा होणार आहेच. त्याबरोबर हडपसर, स्वारगेट, कर्वेनगर, वारजे आणि खडकवासला या दाट लोकवस्तीच्या व व्यावसायिकदृष्ट्या महत्त्वाच्या भागांतील वाहतूक कोंडीत लक्षणीय घट होण्याचा अंदाज महामेट्रोकडून व्यक्त करण्यात आला आहे.त्याचबरोबर नळ स्टॉप- वारजे-माणिकबाग या ६.१२ किलोमीटर लांबीच्या मार्गावर सहा अन्नत स्थानके असणार आहेत.

दोन्ही मार्गिकांमुळे शहराचा पूर्व, मध्य व पश्चिम-दक्षिण-पश्चिम भाग एकमेकांशी थेट जोडला जाणार असल्याचेह महामेट्रोच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

# मतदारांना मतदानाच्या हक्कापासून वंचित ठेऊ नये

श्रावण हर्डीकर



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने आगामी निवडणुकीसाठी प्रसिद्ध केलेल्या प्रारूप मतदार याद्यांमध्ये गोंधळ झाल्याचा आरोप सत्ताधारी भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने केल्यानंतर आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी तातडीने निवडणूक विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली.**

**मतदारांना त्यांच्या मतदानाच्या हक्कापासून वंचित ठेऊ नये, प्राप्त झालेल्या हरकती, सूचनांनुसार काटेकोरपणे दुरुस्त्या करण्याचे निर्देश आयुक्त हर्डीकर यांनी अधिकाऱ्यांना दिले.**

अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, सह आयुक्त मनोज लोणकर, शहर अभियंता मकरंद निकम, निवडणूक विभागाचे उपायुक्त सचिन पवार, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे यावेळी उपस्थित होते.नागरिकांचा मतदानाचा मूलभूत हक्क अबाधित राहण्यासाठी प्रत्येक मतदाराची नोंद बरोबर व अद्ययावत असणे अत्यावश्यक आहे. यासाठी नागरिकांची माहिती नाव, पत्ता, वय, सुधारणा, नवीन समावेश आणि वगळण्यात आलेल्या नोंदी यांची व्यवस्थित पडताळणी करावी. प्रारूप मतदार यादीच्या प्रक्रियेत नागरिकांच्या हरकती व सूचना स्वीकारून त्या सोडविण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश आयुक्त हर्डीकर यांनी दिले. संबंधित विभागांमध्ये समन्वय साधून माहितीची पडताळणी, दस्तऐवजांची शहानिशा, पत्ता बदल, नाव दुरुस्ती आणि नवीन नोंदी यासह सर्व बाबींचे व्यवस्थित वर्गीकरण केल्यास मतदार यादी अधिक अचूक आणि अद्ययावत राहते. प्रारूप मतदार याद्यावरील नागरिकांच्या हरकती व सूचनांवर कार्यवाही करण्यासाठी अतिरिक्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, अशी सूचनाही त्यांनी केली.प्रारूप मतदार यादीत ३२ प्रभागांमधील दुबार मतदारांची नावे काढण्यात यावीत. मतदान केंद्रांची निश्चिती, आवश्यक ठिकाणी तात्पुरती मतदान केंद्रे उभारणीची तयारी करावी. मतदान यंत्रांसाठी स्ट्रॉंग रूम उभारावी. मतदारांना मतदानासाठी कोणतीही अडचण येऊ नये, पारदर्शकता आणि सुरळीत निवडणूक प्रक्रिया पार पाडावी. मतदान केंद्रांची पाहणी करणार असल्याचे आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी सांगितले.

# महिला अत्याचाराविरोधात दुर्गा ब्रिगेडचे लाक्षणिक उपोषण

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात दुर्गा ब्रिगेड संघटनेतर्फे बालिका व महिलांवरील अत्याचारांच्या विरोधात उपोषण आयोजित करण्यात आले. संस्थापक अध्यक्षा कु.दुर्गा भोर यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने महिला, सामाजिक कार्यकर्ते आणि दुर्गा ब्रिगेडच्या कार्यकर्त्या सामाजिक राजकीय ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले.**




संविधान दिनी महिलांना न्यायासाठी रस्त्यावर उतरावे लागणे ही खेदाची गोष्ट आहे शासनाने शक्ती कायदा त्वरित अंमलबजावणी न केल्यास तसेच आरोपींना त्वरित फाशीची शिक्षा न दिल्यास मंत्रालयावर महिलांचा विराट आक्रोश मोर्चा काढणार असल्याचे दुर्गा भोर यांनी नमूद केले. राज्यातील महिला सुरक्षेची दयनीय परिस्थिती, वाढती गुन्हेगारी, फास्टट्रॅक कोर्टातील विलंबित निकाल शक्ती कायद्याची अंमलबजावणी नाही आणि मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे कायद्यांचा प्रत्यक्ष फायदा होत नसल्याची गंभीर टीका यावेळी करण्यात आली.

**यावेळी दुर्गा ब्रिगेड संघनेतर्फे दुर्गा भोर यांनी मुख्य मागण्या केल्या त्यात शक्ती कायद्याची तात्काळ आणि प्रभावी अंमलबजावणी -**

1. मालेगाव प्रकरणातील आरोपीस फास्टट्रॅक कोर्टामार्फत त्वरित फाशी
2. राज्यातील महिला व मुलींवरील अत्याचार थांबविण्यासाठी कठोर उपाययोजना
3. फास्टट्रॅक कोर्टातील प्रकरणांचा 1–1.5 वर्षांचा विलंब तात्काळ कमी करावा

कायदा-सुव्यवस्था सुधारून महिला सुरक्षिततेस प्राधान्य द्यावे आणि राज्यातील शहरातील बालिका शालेय विद्यार्थिनी महिला कामगार आणि गृहिणींना सुरक्षित वातावरण निर्माण करून देणे हे सांगितलेउपोषणाचा समारोप संत तुकाराम नगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरख कुंभार आणि कॉन्स्टेबल कोमल गरड यांच्या हस्ते दुर्गा भोर यांचे उपोषण सोडण्यात आले

उपोषणस्थळी भेट देऊन पाठिंबा दर्शविणाऱ्या मान्यवरांमध्ये विविध पक्षाचे राजकीय आणि संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते त्यात प्रामुख्यानेमाजी नागसेविका सुलभाताई उबाळे वैशाली घोडेकर सुलक्षणा धर प्राजक्ता पांढरकर यशवंत भोसले, निलेश मुटके, दत्ता भांडेकर ,अझीज शेख ,बाळासाहेब भागवत, दिलीप पांढरकर,अभय भोर दीनानाथ जोशी शरद टेमगिरे धम्मराज साळवे राजाभाऊ सरोदे, प्रल्हाद कांबळे, रामभाऊ दरवडे, शरद टेमगिरे, वैभव जगताप , सदाशिवराव पाटील गणेश भांडवलकर,, वेजनाथ शिरसाट, ॲड. सचिन पवार शुभम यादव बी आर माडगूळकर यांचा समावेश होता.दुर्गा ब्रिगेडच्या महिला कार्यकर्त्यांपैकी रहिसा पठाण, रेश्मा मुल्ला, नाझिया शेख, सविता शेंडगे, लक्ष्मीनाथ टिळक, संगीता विद्यागज, सुजाता काळे, मोहसीना शेख, सलोनी पहाडवाले, आशा कोळपे, कविता कंकाळ वैशाली बोत्रे आणि नीता पांचाळ यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.उपोषणाच्या माध्यमातून दुर्गा ब्रिगेडने राज्य सरकारला कठोर इशारा दिला की, महिला अत्याचारांच्या घटना न थांबल्यास संघटना रस्त्यावर आणखी तीव्र आंदोलन उभे करेल. इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष श्री अभय भोर यांनी सूत्रसंचालन केले .

# ‘नमामी इंद्रायणी’ प्रकल्पासाठी निविदा प्रसिद्ध!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी- चिंचवड - पिंपरी-चिंचवडकरासंह तमाम वारकरी सांप्रदायामध्ये श्रद्धेचे स्थान असलेली इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाला चालना मिळाली असून, महानगरपालिका प्रशासनाने निविदा प्रसिद्ध केली आहे.**



भाजपा आमदार महेश लांडगे यांनी ‘व्हीजन-2020’ या अभियानामध्ये ‘नमामी इंद्रायणी’ प्रकल्पाची घोषणा केली होती. त्यानंतर 2019 व 2024 च्या विधानसभा निवडणुकीत हा मुद्दा चर्चेत राहिला. राज्य शासनाची पर्यावरण समिती आणि राज्य स्तरीय तांत्रिक समितीच्या मान्यतेसाठी हा प्रकल्प प्रलंबित होता.दरम्यान, तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पर्यावरण समितीची मान्यता घेण्यासाठी सकारात्मक सहकार्य केले. त्यानंतर विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य स्तरीय तांत्रिक समितीची मान्यता देण्यासाठी सर्वोतोपरी निर्णय घेतला. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने आता निविदा प्रक्रिया राबवण्यासाठी आवश्यक असलेल्या ‘इस्टिमेंट कमिटी’समोर हा विषय ठेवला होता. त्याला मान्यता देण्यात आली. त्यानंतर आता निविदा प्रसिद्ध केली आहे. पहिल्या टप्प्यात 526 कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

**पर्यावरण प्रेमींच्या सूचनांचा अंतर्भाव...**

शहर आणि परिसरातील पर्यावरण प्रेमी संस्था, संघटनांच्या प्रतिनिधींनी नदी सुधार प्रकल्पाचा विकास आराखडा अंतिम करताना महानगरपालिकेच्या Master plan मध्ये दर्शवल्यानुसार विविध ठिकाणी 60 एमएलडी क्षमतेचे मैलाशुद्धीकरण केंद्र सदर कामामध्ये प्रस्तावित केले आहे.

तसेच, Water ATM, Public Toilet, Street Furniture, Chain link fencing compound wall आणि बायोडायव्हर्सिटी पार्क इत्यादी कामांचा समावेश करण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या अमृत- 2 उपक्रमांतर्गत या प्रकल्पाचे काम होणार आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शुक्रवार दिनांक 28/11/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# मतदार याद्या झोपेत तयार केल्या का?

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी - महापालिका निवडणुकीसाठी प्रसिद्ध केलेल्या प्रारुप मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर घोळ आहे. याद्यांमधील गोंधळामुळे महापालिका निवडणूक यंत्रणेवर मोठ्या प्रमाणावर आरोप होत आहेत. राजकीय पक्षांनी वरिष्ठ अधिकार्यांना धारेवर धरले असून सत्ताधारी भाजपाच्या मदतीने हा घोळ केला असल्याचा आरोप केला आहे. त्यानंतर या मतदार याद्यांच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी घेतलेल्या बैठकीत



आयुक्त तथा प्रशासक श्रावण हर्डीकर यांनी चांगलाच संताप व्यक्त केला. झोपेत मतदार याद्या तयार केल्या का? अशा शब्दात त्यांना अधिकाऱ्यांना धारेवर धरले असल्याचे समजते.राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार गुरुवारी (दि.२०) प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी महापालिकेच्या मतदार यादी कक्षात, आठ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये, तसेच महापालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तेव्हापासून मतदार याद्यांमधील त्रुटी व चुकांवरून सातत्याने प्रशासनावर आरोप होत आहेत. सत्ताधारी आणि विरोधी असे आरोप-प्रत्यारोप होत असून यात अधिकाऱ्यांना लक्ष्य केले जात आहे. या सगळ्यात महापालिकेत आयुक्त हर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच प्रारूप मतदार यादीवरील हरकती व सूचनांबाबत एक आढावा बैठक पार पडली.या बैठकीत निवडणूक व मतदार याद्याचे कामकाज करणाऱ्या अधिकाऱ्यांना आयुक्त हर्डीकर यांनी चांगलेच फैलावर घेतले. विधानसभा मतदारसंघाच्या याद्या फोडून प्रभागनिहाय याद्या तयार करताना अधिकारी, कर्मचाऱ्यांनी दक्षता घेतलेली नाही.

त्यामुळे यादीत चुका दिसून येत आहेत. यावरून आयुक्त हर्डीकर यांनी अधिकाऱ्यांना खडे बोल सुनावले. अधिकाऱ्यांना तुम्ही हे काम झोपेत केले का ? गांजा पिऊन काम केले का, अशा भाषेत आयुक्तांनी संताप व्यक्त केला.

# परिचारीकेच्या नावावर बनावट बँक खाते

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड :परिचारीकेच्या नावावर बनावट बँक खाते उघडून त्या खात्यामधून सायबर गुन्हे करत करोड़ोंची आर्थिक हेराफेरी करणाऱ्या तीन जणांना पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांनी सांगली, मुंबई आणि अहमदाबाद विमानतळावरून अटक केली आहे. या गुन्ह्याचा मास्टरमाइंड क्रिप्टोकरन्सीद्वारे व्यवहार करून सतत ठिकाण बदलत होता. अखेर तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे ही मोठी कारवाई करण्यात आली.**



गुन्हा क्रमांक ४२/२०२५ अंतर्गत फिर्यादी यांना Telegram वरील 85 SC India Stock Circle या ग्रुपमधून शेअर ट्रेडिंगमध्ये जास्त नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून तब्बल २,१०,०४,७९४/- रुपयांची फसवणूक करण्यात आली. ॲडमिन Lata Gupta @GGPPLU2 व इतर हँडल्समार्फत विविध लिंक पाठवून पैसे ट्रान्सफर करण्यास भाग पाडण्यात आले.

तपासादरम्यान फिर्यादींच्या पैशांपैकी ७८ लाख रुपये सारस्वत बँक खात्यामध्ये जमा झाल्याचे निष्पन्न झाले. हे खाते सांगली येथील पूनम रफिक शिकलगार हिच्या नावे असल्याचे आढळले. प्राथमिक चौकशीत तिने खाते आपले नसल्याचे सांगितले; परंतु कसून तपासात तिने हे खाते तिच्या मित्र मोहम्मद सईद मोहिउद्दीन पटेल (रा. सांगली) याला दिल्याची कबुली दिली.मोहम्मद सईदने हे खाते समर गुप्ता याला १२ लाख रुपये रोख रकमेच्या व्यवहारात दिल्याची माहिती मिळाली. पुढील तपासात समर गुप्ता हे नाव खोटे असून त्याचे खरे नाव विशाल दिनेश ठक्कर (रा. ठाणे) असल्याचे समोर आले. विशाल ठक्कर हा क्रिप्टोकरन्सीमार्फत (Binance USDT) व्यवहार करून खात्यांचा वापर करत असल्याचे स्पष्ट झाले.विशाल ठक्करच्या माध्यमातून तपास मास्टरमाइंड फॉर्च्युन पर्यंत पोहोचला. तो वाराणसीहून अहमदाबादला विमानाने येत असल्याची माहिती मिळाल्यानंतर सायबर पोलिसांनी अहमदाबाद विमानतळावर सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याचे खरे नाव हर्ष सुरेंद्रप्रताप भदोरिया (रा. कानपूर, उत्तर प्रदेश) असल्याचे समोर आले. देशभरातील किमान २६ नागरिकांची करोडो रुपयांची फसवणूक केल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न झाले आहे.

**अटक आरोपी :**

1. मोहम्मद सईद मोहिउद्दीन पटेल, वय २५, रा. सांगली
2. विशाल दिनेश ठक्कर उर्फ समर गुप्ता, वय २८, रा. ठाणे
3. हर्ष सुरेंद्रप्रताप भदोरिया उर्फ फॉर्च्युन, वय ३२, रा. कानपूर

आरोपींकडून एकूण ६ मोबाईल फोन जप्त करण्यात आले असून ₹३९,६२,३१५/- रुपये होल्ड करण्यात आले आहेत.

ही कारवाई मा. पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली पोलीस निरीक्षक रविकिरण नाळे व सायबर पोलीस पथकाने केली. न्यायालयीन प्रक्रियेत सरकारी अभियोक्ता सुरत मोहिते यांनी सहकार्य केले.

सायबर पोलिसांच्या तात्काळ व कौशल्यपूर्ण कारवाईमुळे या मोठ्या फसवणूक रॅकेटचा पर्दाफाश झाला असून पुढील तपास सुरू आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
शुक्रवार दिनांक 28/11/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# पीसीसीओइआर च्या मुलींची बॉल बॅडमिंटन स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट संचलित रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड रिसर्च येथील मुलींच्या संघाने इंटर कॉलेज बॉल बॅडमिंटन (मुली) स्पर्धा या विभागीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत द्वितीय क्रमांक मिळवला.**



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती आणि रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड रिसर्च यांच्या वतीने रावेत येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन बॉल बॅडमिंटन (मुली) स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत अंतिम सामन्यात हडपसर येथील एस. एम. जोशी महाविद्यालयाने पीसीसीओईआर च्या संघास पहिल्या फेरीत ३५ - २३ आणि दुसऱ्या फेरीत ३५ - २० असा सरळ सेट मध्ये पराभव करून प्रथम क्रमांक मिळविला. सेमी फायनल सामन्यात पीसीसीओईआर संघाने हडपसर येथील ए. एम. महाविद्यालय संघावर प्रथम फेरीत ३५ - २४, द्वितीय फेरीत १६ - ३५, तर तृतीय फेरीत ३५ - २५ गुणांनी विजय मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला. पीसीसीओईआर संघातील लेखा कोतवाल आणि श्रावणी जगताप यांची पुणे विभागीय बॉल बॅडमिंटन स्पर्धेसाठी पुणे जिल्हा संघात निवड झाली. द्वितीय क्रमांक प्राप्त पीसीसीओईआर संघात कल्याणी कोळपे, मन्हा मुलानी, सृष्टी पाटील, भार्गवी काळभोर, वैष्णवी जगताप, मनस्वी रणखांब, वैष्णवी कल्याणकर, ज्ञानेश्वरी वर्पे या विद्यार्थिनींचाही समावेश होता. स्पर्धेचे आयोजनात शारीरिक शिक्षण संचालक मिलिंद थोरात, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे सचिव डॉ. अमेय काळे, प्रा. ऋषिकेश कुंभार, प्रा. अमोल आहेर, प्रा. राजेंद्र लांडगे यांनी सहभाग घेतला. पीसीसीओईआरचे संचालक डॉ. हरीश तिवारी, आर. अँड डी. विभाग प्रमुख डॉ. सुदर्शन बोबडे, पीसीसीओई क्रीडा संचालक प्रा. संतोष पाचारणे यांनी मार्गदर्शन केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी विजयी संघाचे अभिनंदन करून लेखा कोतवाल व श्रावणी जगताप यांना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# हेमंतकुमार यांच्या हिंदी - मराठी गीतांनी श्रोते मंत्रमुग्ध

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी :इंडियन म्युझिकल क्लब प्रस्तुत हेमंतकुमार यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित 'द सोलफुल मेलोडिज ऑफ हेमंतकुमार' या अवीट गोडीच्या हिंदी - मराठी गीतांच्या सुरेल नि:शुल्क सांगीतिक मैफलीत बुधवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ रोजी निगडी प्राधिकरणातील ग. दि. माडगूळकर प्रेक्षागृहात श्रोते मंत्रमुग्ध झाले.**

**राखी झोपे यांची संकल्पना आणि अनिल झोपे यांच्या संयोजनातून साकार झालेल्या या सांगीतिक मैफलीत माजी उपमहापौर शैलजा मोरे, सामाजिक कार्यकर्ते सलीम शिकलगार, उद्योजक शंकर गावडे आणि विनीत राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती.**




राजकुमार सुठवाल, आशुतोष ठाकूर, मंगेश उमराणी, सुकेतू शाह, संजीव रानडे, सागर पाटील, दत्तात्रय कुंभार, उमेश घाणेकर, अनिल झोपे या गायकांसह स्वाती केसकर, नम्रता सारडा, नयना काळकर या गायिकांनी मैफलीत आपला सुरेल सहभाग नोंदवला. याशिवाय मीरा भावे आणि उल्हास भावे तसेच मंजुषा तातू आणि राजेश तातू हे दांपत्यही या सुरेलयात्रेत सहभागी झाले होते.धीरगंभीर आवाजाचा गायक आणि श्रवणीय गीतांचा संगीतकार ही हेमंतदा यांची संगीत श्रेत्रातील सफल कारकीर्द सहभागी गायक कलाकारांनी वैविध्यपूर्ण गीतांच्या प्रभावी सादरीकरणातून साकार करीत श्रोत्यांकडून वन्स मोअरसह उत्स्फूर्त टाळ्यांची दाद मिळवली. या सांगीतिक मैफलीत 'तुम पुकार लो...', 'या दिलकी सुनो...', 'ये रात ये चाँदनी...' , 'बेकरार करके...' , 'भँवरा बडा नादान...' , 'जाने वो कैसे लोग थे...' , 'तेरी दुनिया में...' , 'ना तुम हमे जानो...', 'वो शाम कुछ...' , 'ना ये चाँद होगा...' , 'जरा नजरोंसे कहे दो...', 'पिया ऐसे जियाँ में...' , 'ये नयन डरे डरे...' , 'कही दीप जले कही दिल...' , 'कुछ दिलने कहाँ...' या एकल आणि 'तुम्हे याद होगा...' , 'आ नील गगनके तले...' , 'गोमू संगतीनं...' , 'गुमसुमसा ये जहाँ...' , 'छुपा लो यू दिलमें...' , 'नींद ना मुझको आये...' , 'इतना तो कहे दो...' , 'याद किया दिलने...' , 'एक बार फिर...' , 'तुम्ही मेरे मीत हो...' या युगुल आणि द्वंद्व स्वरातील एकाहून एक सुंदर गीतांना श्रोत्यांनी उत्स्फूर्त दाद दिली. गीतांच्या ठेक्याला टाळ्यांची साथ देत अन् वन्स मोअरची मागणी करीत असलेल्या रसिक श्रोत्यांना 'मी डोलकर...' या सदाबहार गीतावर नृत्य करण्याचा मोह आवरता आला नाही. उत्तरोत्तर रंगत गेलेल्या या मैफलीचा समारोप 'प्रीतीच्या चांदराती... या भन्नाट मराठमोळ्या गीताने करण्यात आला. म्युझिक व्हिजनने ध्वनिसंयोजन केले. विक्रम क्रिएशन्सने तांत्रिक साहाय्य केले. संजय वाघचौरे यांनी छायाचित्रण केले. मनीष गोखले यांच्या खुमासदार आणि अभ्यासपूर्ण निवेदनामुळे मैफल अधिकच रंगतदार झाली.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968




अधिक माहिती साठी संपर्क : 7218327321 / 7620889734